
दैनिक **लोकआरंभ** लोकक्रांतीचा आरंभ

dainiklokaarambh@gmail.com | LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार २० सप्टेंबर २०२५ | अंक २७१ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

**आजचा दिनविशेष**

१६३३ : पृथ्वी सूर्याभोवती फिरते असे प्रतिपादन केल्या बद्दल गॅलिलिओवर खटला भरण्यात आला.






# मनोज जरांगे पाटलांना मोठा संशय, थेट म्हणाले, आता आम्ही भुई धरली


### रोज समाजाचं काम करणारा, मोर्चे काढणारा, अभ्यास करणारा ज्ञानी बुद्धी जिवी रोज नाही बोलू शकत

मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील उपोषणानंतर त्यांना मोठे यश मिळाले. आझाद मैदानावर सुरू असलेल्या उपोषणाच्या पाचव्या दिवशी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि काही आणखीन मंत्री आणि आमदार जरांगे यांच्या उपोषणाच्या मंचावर पोहोचले आणि त्यांनी आठ महत्वाच्या मागण्यांपैकी 6 मान्य करत थेट उपोषण संपवले. यामध्ये हैद्राबाद गॅझेट आणि मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण अशाही मागण्या मान्य केल्या. सातारा गॅझेटसाठी सरकारने जरांगे यांच्याकडे वेळ मागितला आहे.



सध्या मराठवाड्यातून पूर्ण मराठा हा ओबीसीमध्ये गेल्याचे जरांगे यांनी जाहीरही केले. मात्र, ओबीसी समाज सरकारने काढलेल्या या जीआरविरोधात रस्त्यावर उतरताना दिसतोय. हा जीआर म्हणजे ओबीसींवर मोठा अन्याय असल्याचे त्यांनी म्हटले. आता नुकताच मनोज जरांगे पाटील यांनी मोठे भाष्य केले. जरांगे पाटील यांनी म्हटले की, अनुभवी लोक बोलत आहेत, त्यांचे वयही आहे आणि त्यांनी कामही केले हे खरं आहे. ते जे सांगत आहेत ते चूक आहे की, बरोबर हे देखील शोधू पण नंतर..हकरत नाही. त्यांच्या बोलण्याला आपण सन्मान दिला पाहिजे. पण हे कधी...जेव्हा तुम्ही एकदा बोलले दोनदा बोलले फक्त तेव्हाच..ज्ञानी माणून आणि अभ्यासू माणूस काय करतो... एकदा दोनदा मीडियाच्या माध्यमातून बोलतो. नाही ऐकले तर तो थेट थांबतो. पण 20 ते 22 दिवस रोज रोज तेच सातत्याने म्हणणे म्हणजे हा राजकीय डाव शिजतोय, खूप मोठं षडयंत्र शिजतंय. रोज समाजाचं काम करणारा, मोर्चे काढणारा, अभ्यास करणारा ज्ञानी बुद्धी जिवी रोज नाही बोलू शकत. मी हे बोलण्याचे कारण म्हणजे मी तुम्हाला आवाहन केले ना मी या म्हणून. तुम्ही येत नाहीत आणि नंतर बोलता. मी अगोदरच सांगितले होते की, काही रूसवे, फुगवे असतील तर समाजासाठी सोडून द्या. पुढे मनोज जरांगे पाटील म्हणाले की, सर्वांनी या असे मी हात जोडून सांगितले होते. तेव्हाही आले नाहीत आणि आताही आले नाहीत. मग आता यावरून दिसतंय की, सातत्याने हे बोलत आहेत, म्हणजे खूप मोठा डाव शिजत आहे. आता हे कोण करतंय हे आम्ही उघडे पाडणार आहोत.

## मराठा विरोधात ओबीसी वादावर मकरंद अनासपुरे यांचं मोठं वक्तव्य,





सरकारने राज्यात हैदराबाद गॅझेटचा जीआर काढला आहे, मात्र त्यानंतर वातावरण चांगलंच तापलं आहे. मराठा विरोधात ओबीसी समाज असं चित्र निर्माण झालं आहे. मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर राज्यात लागू करण्यात आलेल्या हैदराबाद गॅझेटला ओबीसी समाकडून जोरदार विरोध होत आहे. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देऊ नका अशी त्यांची मागणी आहे.

तर दुसरीकडे आता याच गॅझेटवरून राज्यात आणखी एक संघर्ष निर्माण झाला आहे, तो म्हणजे बंजारा समाज आणि आदिवासी समाज आमने-सामने आले आहेत. हैदराबाद गॅझेटनुसार आमचा समावेश हा एसटीमध्ये करावा अशी मागणी आता बंजारा समाजानं केली आहे. तर बंजारा समाजाच्या या मागणीला आदिवासी समाजानं जोरदार विरोध केला आहे. या मागणीविरोधात आदिवासी समाजाचे नेते एकवटले आहेत. दरम्यान राज्यात सुरू असलेल्या या सर्व वादावर आता अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी पहिल्यांदाच प्रतिक्रिया देताना मोठं वक्तव्य केलं आहे. समाज तुटू नये, समाज तुटला तर अराजक निर्माण होते, असं मकरंद अनासपुरे यांनी म्हटलं आहे. तसेच शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत द्यावी ही सरकारला विनंती असं देखील अनासपुरे यांनी म्हटलं आहे. नेमकं काय म्हणाले अनासपुरे?

राज्यात सध्या सुरू असलेल्या ओबीसी विरोधात मराठा आणि बंजारा विरोधात आदिवासी वादावर मकरंद अनासपुरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. समाज तुटू नये, समाज तुटला तर अराजक निर्माण होते. आपण भावंडांसारखे आणि एक समाज म्हणून राहतो. जेव्हा आपल्यावर संकट येते, तेव्हा एकत्रितपणे आपण धावून जातो. एका मोळीची आणि एका लाकडाची गोष्ट आपल्या सर्वांना माहिती आहे. मोळीच्या अवस्थेत आहोत तोपर्यंत तोडणे शक्य नाही आणि लाकूड होत गेलो तर तोडणं सोप होईल. गावकी आणि भाऊकी एकत्र होती ती अशीच एकत्र रहावी हीच मनापासून भावना आहे.

## वर्गीकृत कर्मचाऱ्या प्रमाणे लाभ द्यावा




क्षेत्रीय स्तरावर तलाठी सज्जा तसेच वरिष्ठ महसुली कार्यालयात महसूल सेवक (कोतवाल) २४ तास शासकीय वेळेत सेवा देत असून, महसूल सेवक जबाबदारी पार पाडत आहे. परंतु शासनाने अद्ययावत महसूल सेवक (कोतवाल) पदास शासनाच्या वर्गीकृत कर्मचाऱ्यांच्याप्रमाणे सेवासुविधा लागू केलेल्या नाही. यामुळे शासनाने याबाबत योग्य तो निर्णय घेऊन चतुर्थ श्रेणी कर्मचारी दर्जा द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## बेलूरा येथे विद्यार्थ्यांचा सन्मान, शैक्षणिक साहित्याचे वाटप - श्री तुळजाभवानी सार्वजनिक गणेश मंडळ, बळीराजा प्रतिष्ठानचा उपक्रम

बीड : तालुक्यातील बेलूरा गावात श्री तुळजाभवानी सार्वजनिक गणेश मंडळ व बळीराजा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने 5 सप्टेंबर रोजी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात ज्यांनी सहभाग नोंदविला त्या सर्व विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्याचे आश्वासन गावाचे आधारस्तंभ राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बळीराम गवते पाटील यांनी दिले होते.

या आश्वासनाप्रमाणे 19 सप्टेंबर रोजी सकाळी 11 वाजता बळीराम गवते यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आली. बक्षीस स्वरूपात परीक्षेसाठी आवश्यक कंपास, पेन असे शैक्षणिक साहित्य आणि सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.




यावेळी बळीराम गवते यांचा आणि उपस्थित सर्व मान्यवर तसेच गावकरी यांचा गणेश मंडळातर्फे सत्कार करण्यात आला. तसेच बेलूरा येथील शाळेतून नुकतेच बदली झालेले गणेश कदम सरांचा सुद्धा गौरव करण्यात आला. नवीन बदली होऊन आलेल्या शिक्षकांचा मुख्याध्यापिका श्रीमती जोशी, शिक्षिका मस्के, वडगावकर, पुरी, तसेच गावातील दोन होले आणि कदम यांचा बळीराजा प्रतिष्ठान आणि गावकऱ्यांच्यावतीने सर्व शिक्षकवृंदाचा यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला गावचे सरपंच दिलीप गिरी, ग्रामपंचायत सदस्य गोविंद गवते, सत्येश्वर गवते, आबासाहेब गवते, मसू डोंगरे, हनुमान सोनवणे, रेवणनाथ भवर, लहू लाटे, राजेंद्र गवते, गवळी लाटे, सोमनाथ गवते, तात्यासाहेब लाटे, अशोक गवते, सचिन भवर, राहुल लाटे, प्रकाश गवते, अशोक गिरी तसेच गणेश मंडळाचे सर्व सदस्य दादासाहेब लाटे, विशाल गवते, ज्ञानेश्वर गवते, अक्षय गवते, तुषार गवते, करण लाटे, अशोक गवते, ऋषिकेश लाटे यांच्यासह बेलूरा गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## बीड येथे उद्या होणाऱ्या नमो युवा रन मॅरेथॉनमध्ये युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे..

### भाजपा युवा मोर्चाचे बीड जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांचे आवाहन

वडवणी | प्रतिनिधी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त नमो युवा रन नशा मुक्त मॅरेथॉन चे बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे रविवार दि. २१ सप्टेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे व भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या उपस्थितीत नमो युवारन नशामुक्त भारत,मॅरेथॉन पार पडणार आहे तरी बीड जिल्ह्यातील तरुण, युवक, युवती, क्रिडापट्टु, धावपट्टु यांनी बहुसंख्येने सहभागी व्हावे असे आवाहन भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

देशाचे कणखर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त दि.१७ सप्टेंबर ते दि. २ ऑक्टोबर पर्यंत भारतीय जनता पार्टी पक्षाच्या वतीने सेवा पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने भाजपा युवा मोर्चाच्या वतीने नमो युवारन, नशामुक्त भारत,मॅरेथॉन स्पर्धेला पर्यावरण व हवामान बदल,पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे या हिरवा झेंडा दाखवणार आहेत.व भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांची उपस्थिती लाभणार आहे. ही स्पर्धा बीड शहरातील छत्रपती शिवाजी चौकात सकाळी ७:०० वाजता पार पडणार आहे. या मॅरेथॉन मध्ये चार गट करण्यात आले आहे. वय १६ ते ३०




वर्ष वयोगट, ओपन गट, महिलांसाठी वय १६ ते ३० वर्ष वयोगट, महिलांसाठी ओपन गट असे चार गट करण्यात आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते चऱ्हाटा फाटा ते छत्रपती शिवाजी चौक असे ५ कि.मी.रन असणार आहे. यामध्ये पारितोषिक ठेवण्यात आले असून प्रथम बक्षीस ५ हजार रुपये, द्वितीय ३ हजार, तृतीय २ हजार असे प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात येणार आहे. व सहभागी धावपट्टू यांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात येणार असून या स्पर्धेत बीड जिल्ह्यातील युवक, युवती, क्रीडापटू, धावपटू, डॉक्टर, वकील, पत्रकार,पोलीस व नागरिकांनी गुगल वरील लिंकवर किंवा क्यूआर कोडवर रजिस्ट्रेशन करून या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे अशा आवाहन भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष संजय आंधळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

## महसूल सेवक पदास शासकीय चतुर्थ श्रेणी दर्जा देण्याची संघटनेची मागणी

### अन्यथा बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा



धारूर : महसूल सेवक पदाचे महसूल यंत्रणेतील स्थान आणि कार्य लक्षात घेता त्यांना इतर महसूल कर्मचाऱ्यांप्रमाणे शासकीय सेवासुविधा देण्यासाठी चतुर्थ श्रेणीच्या दर्जा देऊन अन्याय दूर करावा, अन्यथा सर्व महसूल सेवक 20 सप्टेंबर पासून कामबंद करतील, अशा आशयाचे निवेदन धारूर तहसीलदार यांना महसूल सेवक संघटनाच्यावतीने देण्यात आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष श्रीराम पवार, उपाध्यक्ष दिगंबर पतंगे, सचिव गोविंद गिरी व महसूल सेवक उपस्थित निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील विविध शासकीय धोरण, उपाययोजना शासन स्तरापासून ते गाव पातळीवरील महत्त्वाच्या योजना अंतिम पोहोचवण्यासाठी घटकापर्यंत महसूल यंत्रणेतील जिल्हाधिकारी ते महसूल सेवक कार्यरत आहेत. महसुली कामाबरोबरच विविध प्रमाणपत्र देणे, अभियान मोहिमांचे समन्वय साधणे, नैसर्गिक आपत्ती गावपातळीवरून आल्यास वरिष्ठ कार्यालयास कळविणे, जनगणना, निवडणूक तसेच खातेदारांच्या शेतात जाऊन पीक पाहणी करणे, अशा अनेक बिगर महसुली कामाची जबाबदारी महसूल सेवकावर आहे.

## राष्ट्रसंत संत भगवान बाबा जयंती येवलवाडीकरांनी मोठ्या उत्साहात साजरी



पाटोदा (प्रतिनिधी) येवलवाडी गावात राष्ट्रसंत संत भगवान बाबा यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी मिरवणुकीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. गावातील नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संत भगवान बाबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. गावातील ज्येष्ठ नागरिक, कार्यकर्ते व मान्यवरांनी संत भगवान बाबांच्या कार्याचा आढावा घेतला व त्यांच्या शिकवणीचे स्मरण करून समाजात बंधुता, प्रेम व एकात्मतेचा संदेश दिला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गावातील तरुण मंडळ व महिला वर्ग यांनी विशेष परिश्रम घेतले. भक्तीमय वातावरणात येवलवाडी करानी राष्ट्रीय संत भगवान बाबा जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली.

## मॉंसाहेब जिजाऊ स्मारक परिसराच्या कामासाठी पालकमंत्री अजितदादांना निवेदन : किशोर पिंगळे

### छत्रपती मराठा भवन कोअर कमिटीचा पुढाकार

बीड | प्रतिनिधी बीड शहरामध्ये अत्यंत मध्यवर्ती भागामध्ये असलेले मॉसाहेब जिजाऊ यांचे स्मारक व तेथील गार्डन मधील विविध विकास कामासंदर्भात आज बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा.ना. अजित दादा पवार यांना छत्रपती सकल मराठा विकास संस्था मार्फत निवेदन देण्यात आले. बीड शहरांमध्ये नगर रोड परिसरातील रहिवाशी भागांमध्ये असलेले एकमेव गार्डन लहान मुले, वयस्कर मंडळी यांना उठणे बसण्यासाठी मध्यवर्ती ठिकाण आहे ,याच ठिकाणी हुतात्मा स्मारक सुद्धा आहे, परंतु त्या ठिकाणी सुविधांचा अभाव लक्षात घेता आज पालकमंत्री अजित दादा पवार हे हुतात्मा स्मारकाला अभिवादन करण्यासाठी आले असता. छत्रपती सकल मराठा विकास संस्थेचे अध्यक्ष किशोर पिंगळे व सदस्य यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले.त्या ठिकाणी लहान मुलांसाठी किड्स पार्क, वयस्कर व्यक्तीसाठी बसवण्यासाठी व फिरण्यासाठी गार्डनमध्ये





व्यवस्था, तसेच महिलांसाठी अध्ययवत जिम, पूर्ण गार्डन परिसराला उंच कंपाऊंड, फ्लेवर ब्लॉक बसवने,साईडने गेलेल्या हाय व्होल्टेज तारा काढणे, तसेच जिजाऊंच्या विविध कार्याचा आढावा घेणारे शिल्प उभारणे, जिजाऊ पुतळ्याच्या पाठीमागे इतिहासकालीन चिरेबंदी सजावट करणे अशा विविध मागण्यांचे निवेदन पालकमंत्री अजित दादा यांना देण्यात आले त्यांनी लगेचच जिल्हाधिकारी यांना बोलावून संबंधित कामाची लवकरात लवकर प्रक्रिया करून मार्गी लावण्यासाठी सुचना केल्या व सर्व कामे लवकरात लवकर मार्गी लागतील असे आश्वासन कमिटीला दिले. प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष किशोर पिंगळे, सुभाषजी सपकाळ, अनिल घुमरे ,प्रा.राजेश भुसारी, राजू पिंगळे ,गोरख शिंदे,औटी बप्पा ,प्रज्ञाताई खोसरे ,नितीन सपकाळ व परिसरातील नागरिक उपस्थित होते.


दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

शनिवार २० सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



सं पा द की य

## स्वत:ला स्वीकारा, दिखाव्याच्या पलीकडचं सौंदर्य




आजकाल सोशल मीडियावर सतत AI-generated फोटो, फिल्टर्स, ब्युटी-इफेक्ट्स हे सगळं एक नॉर्मल ट्रेंड झालंय. प्रत्येकाला स्वत:ला अधिक आकर्षक दाखवायचंय, काहीतरी वेगळं भासवायचंय. पण प्रश्न असा आहे. आपण खरंच तसं आहोत का? आणि सगळ्यात महत्त्वाचं आपण तसं असण्याची गरज आहे का?

खरं तर सौंदर्याची एकच व्याख्या नसते. गोरेपणा, शरीरयष्टी, चेहऱ्याची समेट्री या गोष्टींवर सौंदर्य मोजलं जाऊ शकत नाही. प्रत्येकामध्ये काहीतरी वेगळं असतं, काहीतरी खास असतं, जे दुसऱ्यांकडे नसतं. तेच खरं सौंदर्य आहे.

AI फोटो काढले तर काही वेळ आपल्याला चांगलं वाटतं, “मी एवढा सुंदर दिसू शकतो!” असं मनात येतं. पण हळूहळू हेच फोटो आपल्या मनात न्यूनगंड तयार करतात. “मी मूळात इतका चांगला दिसत नाही...” अशी भावना नकळत मनात घर करू लागते. आणि तेव्हा आत्मविश्वास कमी होतो.

आपण लक्षात ठेवलं पाहिजे सत्य लपवता येत नाही. सतत देखाव्यात जगण्याचा प्रयत्न केला तरी, आयुष्यात खरी ताकद ही मन, विचार आणि स्वभावातली प्रामाणिकता देते.

खरा आत्मविश्वास कुठून येतो?

आपल्या शरीरावर काम करणं आरोग्य, फिटनेस आणि हायजीनकडे लक्ष देणं.

स्वत:चं कौशल्य वाढवणं ज्ञान, कला, कष्ट यावर लक्ष केंद्रित करणं.

आत्मस्वीकृती “मी जसा/जशी आहे तसा/तशीच छान आहे” ही भावना रोज जोपासणं.

आजच्या जगाला खऱ्या अर्थाने “सुंदर” दिसणारे लोक ते नाहीत ज्यांचे फोटो परफेक्ट दिसतात, तर ते आहेत ज्यांचं मन सकारात्मक आहे, चेहऱ्यावर समाधान आहे, आणि वागण्यात खरी माणुसकी आहे.

म्हणूनच, सोशल मीडिया किंवा AI फोटो हे फक्त मजेसाठी वापरा, पण त्यांच्यावर तुमचं मूल्य ठरू देऊ नका.

लक्षात ठेवा:

आपण जगासाठी नाही, तर स्वत:साठी जगतो.

दिखावा काही दिवस टिकतो, पण आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व आयुष्यभर सोबत राहतं.

©® सचिन कमल गणपतराव मुळे...
परभणी, ९७६७३२३३१५

# एम.एस.एस.विधी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ॲड. अंकुशराव टोपे यांच्या जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा, विद्यापीठ छ. संभाजीनगर संलग्नित एम. एस. एस. विधी महाविद्यालय,जालना व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ॲड. अंकुशराव टोपे (संस्थापक, मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना) यांच्या जयंती निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्या डॉ. टी. वाय. शेख यांनी भूषवले. उद्घाटक म्हणून डॉ. बी. आर. गायकवाड (प्रशासकीय अधिकारी, मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना) तसेच प्रमुख अतिथी म्हणून डॉ. शिंदे. व्हि. आर.(आई रुग्णालय, जालना) व डॉ. दादासाहेब गजहंस (प्राचार्य, अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना) , प्राचार्या डॉ.अलका मंडलिक, प्रा . डॉ. संध्या जगताप (मत्स्योदरी बी.पी. एड.महाविद्यालय, जालना) तसेच डॉ . शामल गरड व इतर रक्तपेढी अधिकारी जिल्हा शासकीय रुग्णालय, जालना उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रा. जोशी व्हि.एस.यांनी केले तर आभार प्रा. गोरे एस. जे.यांनी मानले. या शिबिरात बहुसंख्य रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून मानवतेचे मोलाचे कर्तव्य पार पाडले. महाविद्यालयाच्या एन. एस.एस. कार्यक्रमाधिकारी प्रा. हंगरगे एस. डी.यांनी सर्वांचे आभार मानून रक्तदान ही सामाजिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन केले. या शिबिरास प्रा.पवार आर.पी., प्रा. डॉ.देशमुख एस . व्ही.श्री.मापारे इ . के., श्री.कोकणे सी.यू.सह श्री वरखडे आर.पी., श्री पावसे एस.एम., श्री मुळे एन.एस. श्री.उदडंगे अण्णा, श्री.घोलप बी.व्हि.सह विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते .'रक्तदान हेच श्रेष्ठदानची या घोषवाक्याखाली आयोजित या शिबिरामुळे समाजात जनजागृती निर्माण होऊन एन. एस. एस. विभागाचा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला.




# आर्थिक वर्ष 2025-26 साठी रात्रशाळा दुबार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे ऑफलाईन वेतन आदेश तातडीने निर्गमित करावेत

## महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटना अध्यक्ष तानाजी कांबळे यांची शासन दरबारी मागणी.

?मुंबई, दि. 17 सप्टेंबर (प्रतिनिधी): शालेय शिक्षण विभागामार्फत 2024-25 या आर्थिक वर्षात रात्रशाळांमधील दुबार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन ऑनलाईन पद्धतीने करण्याचा आदेश निर्गमित झालेला होता. मात्र 2025-26 या चालू आर्थिक वर्षासाठी अद्याप असा आदेश झालेला नसल्यामुळे संबंधितांचे वेतन प्रलंबित झाले आहे. या गंभीर परिस्थितीकडे लक्ष वेधत महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेने शासनाला तातडीने ऑफलाईन वेतन बिल स्वीकारण्याचे आदेश निर्गमित करण्याची मागणी केली आहे.

संघटनेचे अध्यक्ष श्री. तानाजी कांबळे यांनी सांगितले की, “चालू वर्षात आदेश निघालेले नसल्याने दुबार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन रखडले आहे. शासनाने उशीर न करता ऑफलाईन पद्धतीने वेतन काढण्याचे आदेश काढून वेतन वितरणाची प्रक्रिया सुरू करावी.”

तर उत्तर विभाग अध्यक्ष श्री. अरुण सूर्यवंशी यांनी प्रतिक्रिया देताना म्हटले की, “शिक्षक व कर्मचाऱ्यांना विनाकारण अडचणीत टाकणे योग्य नाही. मागील वर्षीप्रमाणे यंदाही स्पष्ट आदेश निर्गमित करून शासनाने ऑफलाईन पद्धतीने वेतन वितरण करावे.”

शासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन, 2025-26 या आर्थिक वर्षासाठी रात्रशाळांतील दुबार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन ऑफलाईन पद्धतीने नियमित करण्याचा निर्णय घ्यावा, परिपत्रक निर्गमित करावे, अशी महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटनेची ठाम मागणी आहे.

# लेखणी कशी देखणी करावी हे डिजिटल मीडियातून दाखवणारे : गोकुळ इंगोले

मनात जिद्द चिकाटी असेल तर काही पण करू शकतो हे सिद्ध करून दाखवणारे बीड टाईम चे संपादक गोकुळ इंगोले यांचा आज वाढदिवस त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या जीवन कार्यावरलेखणीतून प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करत आहोत प्रथमता वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा.. सामाजिक कार्यातून चळवळीतआलेल्या नेतृत्वाला लेखणीतून मिळालेली धार त्याला दिलेली त्यांच्या शैलीतून डिजिटल मीडियाची साथ समाजाला एक वेगळी दिशा देणार आणि आपलंसं करणार निर्माण झालेलं नेतृत्व म्हणजे गोकुळ इंगोले त्यांनी पत्रकारितेबरोबर डिजिटल मीडियाच्या माध्यमातून लोकांना वेगळी ओळख दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. मित्रांसोबत राहून त्यांच्यातील गुण ओळखत त्या गुणांचा वापर आपल्या जीवनात करण्याचं त्यांची कला वेगळीच आहे. प्रत्येक ठिकाणी काहीतरी मिळणार आहे शिकायला भेटणार आहे ते आपण शिकलो पाहिजे या हेतून प्रत्येक क्षेत्रात जाऊन तिथून काहीतरी शिकावं अशी मनात आज निर्माण करून पत्रकारिता आणि डिजिटल मीडियाच्या माध्यमातून युट्युब फेसबुक इन्स्टा इत्यादी मीडियाचा वापर करत त्यांनी वेगळीच ओळख निर्माण केले आहे. आज डिजिटल मीडियाच्या तालुकाध्यक्षपदी काम करत असताना सहकार्यांना डिजिटल मीडियाच्या माध्यमातून आपणही काहीतरी करू शकतो या हेतून त्यांनी सर्वांनाच वेगळं संदेश देण्याचे काम केले आहे. डिझेल मीडिया कशी असली पाहिजे अशा पद्धतीने काम केलं पाहिजे हे सुद्धा त्यांनी वेळोवेळी दाखवून दिलं आहे आज त्यांच्याकडील





डिजिटल मीडियात काम करत असताना असलेल्या वेगळं कौशल्य हे सर्वांनाच आपलंसं करत आहे. व्हिडिओ एडिटिंग असल किंवा पेपरची डिझाइनिंग असेल करताना हे वेगळं पण ठेवल्याने सर्वांना त्यांच्या कौशल्याचे कौतुक वाटतं आणि शिकत राहण्याची एक आवड ही कायम आहे.. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या जीवन कार्यावर टाकलेला हा छोटासा प्रकाश नक्कीच सर्व त्यांचं जीवन कार्य सांगून जाईल असं आहे... खरंच तू ओळखत माणसं अशी असतात की ते ठिकाण आणि शिकतच राहावं असंच काहीसं त्यांच्यातले गुण आपल्याला पाहायला मिळतात त्यात पैकी एक म्हणजे गोकुळ इंगोले हे आहेत आणि आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त पुनश्च एकदा खूप खूप शुभेच्छा आई जगदंबा अन् छत्रपती शिवरायांचरणी नतमस्तक होऊन उदंड आयुष्य लाभो आणि भविष्यात त्यांच्या हातून असेच चांगले कार्य होत राहो हीच सदिच्छा...

**– प्रा.सचिन पवार**
**निर्भीड पत्रकार**

# मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त हुतात्मा देवराव विद्यालयात आदर्श उपक्रम!

## सैनिकांचा सन्मान, गुणवंतांचा सन्मान, गुणवत्तेत भर!

पाटोदा प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील भायाळा येथील हुतात्मा देवराव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय नावारूपाला येऊ लागले आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी विविध उपक्रम घेऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले जात आहे. संस्था अध्यक्ष सहकार महर्षी रामकृष्ण बांगर साहेब व भायाळा गावच्या सरपंच तथा संस्था सचिव सौ.सत्यभामाताई बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली गावाबरोबर शाळेची ही वाटचाल प्रगतीच्या दिशेने होताना दिसत आहे.

बांगर कुटुंबीयांनी ठरवलं आहे. भायाळा गावातील शिक्षण, आरोग्य, धार्मिक, सामाजिक, निसर्ग संवर्धन तसेच स्वच्छतेवर विशेष लक्ष देऊन भायाळा गाव हे महाराष्ट्राच्या नकाशावर घेऊन जाण्याचा संकल्प केला आहे. विचाराची शिदोरी घेऊन पुढे चाललेल्या बांगर कुटुंबीयांना सर्व क्षेत्रातून वैचारिक पाठबळ मिळत असून प्रत्येक क्षेत्रामध्ये बांगर कुटुंबियांचे बारकाईने लक्ष आहे आणि ज्या ठिकाणी अडचण येईल त्या ठिकाणी सहकार्य करून ते काम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करत आहेत. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त हुतात्मा देवराव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात सैनिकांचा सन्मान, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी प्रत्येक वर्गातील प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांचा रोख स्वरूपात सन्मान करण्यात येणार तसेच विद्यालयात विविध वृक्षांचं लागवड करून सुरू केलेला हा नवीन संकल्प भविष्यात नक्कीच यशस्वी ठरेल यात शंका नाही. या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त विविध संकल्प करून भविष्याचे वेध घेणार ध्येय समोर ठेवले आहे या कार्यक्रमाप्रसंगी संस्थाध्यक्ष सहकार महर्षी रामकृष्ण बांगर साहेब व सरपंच तथासचिव सौ सत्यभामाताई बांगर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला यावेळी विद्यालयाचे प्राचार्य राम वनवे, बी.बी. नागरगोजे, मुळे सर, काळुसे सर, बागडे सर, पाटील सर, जावळे सर, कदम सर, श्रीमती केंगार मॅडम, काळे सर, गर्जे सर, दिनेश बांगर, सोनवणे मामा, तसेच प्राध्यापक कोल्हे सर, नाईकवाडे मॅडम, पवार सर, जामकर सर, वारभूवन मॅडम यांच्यासह गावातील जेष्ठ नागरिक, स्वातंत्र्य सैनिक, युवक वर्ग, विद्यालयातील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते...



### संकल्प! पहिली ते बारावी प्रथम येणाऱ्यांचा होणार सन्मान

हुतात्मा देवराव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय भायाळा येथील पहिली ते बारावी वर्गात प्रत्येक वर्षी पहिला येणाऱ्या विद्यार्थ्यांचा 15 ऑगस्ट रोजी रोक स्वरूपात बक्षीस देऊन होणार सन्मान हा संकल्प मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त भायाळा येथील सेवानिवृत्त अधिकारी बन्सी गणपतराव बांगर यांनी केला आहे, सर्व बक्षीसांची रक्कम त्यांनी विद्यालयाचे प्राचार्य राम वनवे यांना सुपूर्त केली आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २० सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



## ॥ श्री कृष्णार्पणमस्तु ॥




माणसाचा स्वभाव चंचल आहे.त्याला त्याच्याजवळ नसणाऱ्या गोष्टींचं अप्रूप असतं. कधी एकदा तिला मिळवितो असं त्याला झालेले असते. प्रत्येक स्त्रीला हवी असते अशीच एक पाठीशी राहाणारी..मन जपणारी भावना ती स्वत: जरी कणखर असली तरी तिच्या कणखरतेला अजुन कणखर करणारी.. तिच्या विचारांना धार देणारी ही बळकट भावना आणि ती भावना म्हणजे कृष्ण..मग मीरेच्या निष्काम भक्तीला ओ देणारा कृष्ण असो किंवा मधुरा भक्तीत रंगलेला श्रीरंग असो.. दोन्ही रुपे स्रीच्या जवळची. निष्काम निष्कलंक प्रेम, निष्काम भक्ती म्हणजे फक्त श्रीकृष्ण. आयुष्यात प्रत्येक वळणावर कृष्ण भेटायलाच पाहिजे. मनातलं बोलायला, लिहिलेलं वाचायला, रेखाटलेलं दाखवायला, अन् कधी गायलेलं ऐकवायला हक्काचा सवंगडी पाहिजे आणि म्हणूनच प्रत्येकाला एक कृष्ण भेटायलाच पाहिजे मुळात नात्यांच्या पलिकडचे भावबंध जोडणारा,.एक हक्काचा सवंगडी पाहिजे. आपल्या आजुबाजुला तो सापडेलंच असं नाही जोडीदारामध्ये तो गवसेलंच असंही नाही. कुणीतरी जवळचं कृष्ण असण्याची भावनाही उर्मी देणारी पाहिजे मात्र कधी मनाचा पेंद्या झाला नाही पाहिजे हे लक्षात ठेवा.कृष्ण आणि राधा ,किंवा गोप गोपिका यांच्या रासरंगात कुठलीही शारीरीक आसक्ती नव्हती तर परमात्म्याशी आत्म्याचे तादात्म्य पावण्याची भावना होती. .कृष्ण एक भावना आहे . प्रत्येक स्त्रीचा पाठीराखा आहे तो..ती भावना त्या कोवळ्या बालमनाला फुलायला शिकवते ,तारुण्यातल्या भावनांना हळुवार खुलवते आणि वेदनांमध्ये ही सुखावते. ह्या संसाराच्या चक्रातही शीतल वाऱ्यासारखी मनाला आल्हादून जाते.म्हणूनच म्हणावेसे वाटते.....

या जीवनी सर्वस्व तू
वसंत मी वर्षाच तू
मंदिरी या देवता तू
अंतीचा हा विश्वास तू

।। श्री कृष्णार्पणमस्तु ।।

हिरकणी सौ.अनिता गुजर
डोंबिवली
८०९७५२४१९७

# सेवाभावी संस्था प्रबोधन समिती चे उद्योगमंत्री उदयजी सामंत यांच्या हस्ते उद्घाटन !




महाराष्ट्रातील सेवाभावी संस्थांना सर्व बाजूनी सक्षम करण्यासाठी, गेली ३२ वर्ष समाजकारणाचा वसा घेऊन काम करणाऱ्या, ज्येष्ठ समाजसेविका, राष्ट्रीय-आंतर राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या डॉ.सौ.सुनीताताई मोडक यांनी हजारो संस्थांना एका छताखाली आणून, दिनांक १३ सप्टेंबर २०२४ रोजी, सेवाभावी संस्था प्रबोधन समितीची स्थापना केली. या समितीचे उद्घाटन, महाराष्ट्राचे उद्योगमंत्री उदयजी सामंत यांच्या हस्ते पार पडले. यावेळी बोलताना सन्मा. उदयजी सामंत यांनी, ज्या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून माझ्या राजकीय जीवनाचा पाया तयार केला. त्याच पद्धतीच्या महाराष्ट्रातील, अनेक सेवाभावी संस्थांच्या समितीचे उद्घाटन माझ्या हस्ते झाले. याचा मला अतिशय आनंद होत आहे. असे गौरवपर उद्गार काढले. रत्नागिरी ही अशी भूमी आहे की, इथे सुरू झालेलं कोणतंही कार्य अर्धवट राहत नाही. सेवाभावी संस्था या नावालाच ङ्गसेवाभाव आहे. राजकीय रंग न देता जर, आपण सेवाभाव जपला, तर या संस्था समाजप्रबोधनाचं मोठं कार्य करू शकतात. असं वक्तव्य केलं. सेवाभावी संस्था म्हणजे, समाजहितासाठी निरपेक्ष भावनेनं काम करणं. या संस्था पक्षविरहित राहून, समाजाला दिशा देतात. तेव्हाच त्यांचं कार्य खऱ्या अर्थानं प्रभावी ठरतं. समाजामध्ये निर्माण होणारे गैरसमज, अन्याय किंवा राजकीय उपयोगासाठी होणारी चळवळ यावर प्रकाश टाकण्याची ताकद सेवाभावी संस्थांकडे असल्याचं सांगितले. आज या कार्यक्रमात वेगवेगळ्या पक्षांचे प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते एकत्र आलेले पाहून समाधान वाटलं. हीच खरी ताकद आहे. समाजहितासाठी सगळ्यांना बरोबर घेऊन जाण्याची. माझं राजकारण हे देखील सेवाभावी संस्थेतून सुरू झालं. समाजकारणातून मिळालेलं जनतेचं प्रेम आणि विश्वास आजही मला पुढे जाण्याची ताकद देतं. या संस्थेला पुढील कार्यासाठी माझ्या शुभेच्छा ! रत्नागिरी जिल्ह्यात, आणि महाराष्ट्रात शासनस्तरावर आवश्यक ते सर्व सहकार्य दिलं जाईल. याची खात्री या कार्यक्रमानिमित्त दिली. सेवाभावी संस्था प्रबोधन समितीची स्थापना करत असताना, सुनीताताई यांनी महाराष्ट्रातील कोकण, नाशिक, नागपूर, अमरावती, संभाजीनगर, पुणे अशा सहा विभागातून राज्य कार्यकारिणी, प्रकोष्ठ समिती, प्रत्येक विभागाची एक समिती, जिल्हा समिती आणि तालुका समिती अशी रचना केली आहे. यामध्ये राज्यकारिणी मध्ये राज्यअध्यक्षा म्हणून डॉ. सौ. सुनीताताई काम पाहत आहेत. तर प्रकोष्ठ समितीची धुरा सौ. शालिनीताई ठाकरे यांनी घेतली आहे. राज्य कार्यकारिणी मध्ये, कार्याध्यक्षा -अनिता तीपायले, सचिव-लक्ष्मण डोळस, खजिनदार- डॉ.सतिष जगताप, सहसचिव- प्रताप पवार, प्रमुख सल्लागार-भगवंत ऊर्फ बाळा भाऊ पाठक, डॉ. संजय पाटील, राज्यसंपर्क प्रमुख- संचित यादव, किशोर सावंत, नीता पांगुळ, उत्तम पाटील, नंदकिशोर हत्ती हंबीरे, राहुल व्यवहारे, अरविंद पवार, दिनेश भोईर, राज्य सदस्य- कल्याणी कुलकर्णी, शरद दादा उगले, विनायक खानविलकर, दीपाली कुळये, जितेंद्र मेटकर, पराग घारपुरे, प्रविण देवरे, महेश्वर तेटाबे, संजय बगे, सुनील फुलारी, संजय निमळे, विकास पाटोळे, भारती माळी, रोहिणी पवार अशी जम्बो कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. सौ. शालिनीताई ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली प्रकोष्ठ समिती मध्ये उपाध्यक्ष- किरणताई बढे, सचिव- अनिता बोरस्ते, राज्य समन्वयक- अमोल मोडक, निलेश सोनावणे, राज्य रोजगार जनसंपर्क प्रमुख- प्रदीप सोनार, राज्य संपर्क प्रमुख- सुजाताताई डेरे, संध्या कुलकर्णी, राज्य सी. एस.आर. संपर्क प्रमुख- रवींद्र चंदात्रे, राज्य सदस्य- चंदाताई गान, संदीप परब, श्रेया तटकरे, सई संघाई, मिलिंद गान, महेंद्र सोभागे, दिलिप तांदळे, माधवराव पाटील, वैशाली म्हैसदुने, अनिल न्याहाळदे, प्रशांत खरे, प्रियांका समुद्र यांचा समावेश करण्यात आला आहे. या प्रसंगी सेवाभावी संस्था प्रबोधन समितीच्या संस्थापक अध्यक्षा सुनिताताई मोडक, सुजाताताई डेरे, बाळाभाऊ फाटक, डॉ. सतीश जगताप, सचिव लक्ष्मण डोळस समीरजी घारे, राजू भाटळेकर, शिवसेना जिल्हा प्रमुख राहुल पंडीत, शिवसेना महिला जिल्हाप्रमुख शिल्पाताई सुर्वे, उद्योजक संभाजी काजरेकर, विनायक भुसारे-पाटील, बहुजन समाज नेते सुरेश भायजे, डॉ. प्रकाश भांगरत, उद्योजक सचिन माजळकर, आदी मान्यवर, पदाधिकारी, बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक आणि प्रबोधन समितीचे राज्य सदस्य शरददादा उगले यांनी केले.

# अक्षरदीपच्या विद्यार्थ्यांची दमदार कामगिरी







अक्षरशिल्प पिमास प्रायव्हेट लिमिटेड यांचेमार्फत ॲबॅकस आणि मानसिक अंकगणित पामा इंडीया प्रादेशिक स्पर्धेचे भव्य आयोजन शनिवार दिनांक १३ सप्टेंबर २०२५ रोजी नेरुळ, नवी मुंबई येथील आगरी कोळी संस्कृती भवन येथे करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये घणसोली येथील अक्षरदिप क्रिएशन्समधील ४५ मुलांनी सहभाग घेत प्राविण्य मिळवले व विविध गटांमध्ये पारितोषिके पटकावली. मुलांमध्ये मनाची क्षमता वृध्दी व्हावी तसेच मेंदूला चालना मिळावी हया उद्देशाने आयोजित करण्यात येणा-या अॅबॅकस व मानसिक गणना स्पर्धांमुळे त्यांची गणितातील आवड वृध्दींगत होऊन मुले आकडेमोडीमध्ये पारंगत होतात व त्याचा मोठा फायदा त्यांना शालेय अभ्यासामध्येदेखील होतो. सध्याच्या स्पर्धेच्या युगात अशा स्पर्धांमुळे विदयार्थ्यांना चांगले व्यासपीठ उपलब्ध होत असल्याचे अक्षरदिपच्या संचालिका स्वाती भाकले यांनी स्पष्ट केले. यामुळे त्यांचा आत्मविश्वास व स्मरणशक्ती बळकट होत असल्याचेही त्यांनी सांगितले. अक्षरशिल्प पिमास संस्थेच्या वतीने दरवर्षी आयोजित करण्यात येत असलेल्या हया स्पर्धांमध्ये अक्षरदीपची मुले मोठया संख्येने सहभागी होऊन राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये चमकत असल्याचे सौ. भाकले यांनी सांगितले. पामा इंडीयासारख्या नावाजलेल्या स्पर्धांमधील अक्षरदीपमधील विदयार्थ्यांच्या चमकदार कामगिरीसाठी विदयार्थी व पालकांकडून आनंद व्यक्त होत आहे.

# गोखले बी.एड. महाविद्यालयात अध्यापन क्षमता विकसन कार्यशाळा




परळ: गोखले एज्युकेशन सोसायटीच्या शिक्षणशास्त्र व संशोधन महाविद्यालयामध्ये दिनांक 12 व 13 सप्टेंबर 2025 रोजी बी.एड. विद्यार्थी-शिक्षकांसाठी अध्यापन क्षमता विकासाच्या दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आले. . सदर कार्यशाळा सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांची पूर्व चाचणी परीक्षा घेण्यात आली. त्या परीक्षणातून विद्यार्थ्यांना अध्यापन क्षमता विकसन करण्यासाठी आवश्यक असलेल्या घटकांची निवड करण्यात आली व त्यांच्या गरजेनुसार तज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचे उद्घाटन हे प्राचार्य डॉ. सुरेंद्र हेरकळ यांनी केले. तसेच सूत्रसंचालन हे कार्यशाळेच्या कौशल्य विकसन समन्वयिका डॉ. शिल्पा वाकचौरे यांनी केले. सदर कार्यशाळेमध्ये डॉ. संगीता पाटकर यांनी कौशल्य परस्पर क्षमता, डॉ. सुरेंद्र हेरकळ यांनी ग्रीन आयसीटी, डॉ. विनोद गावित यांनी अनुदेशन नियोजन, डॉ. प्रशांत काळे यांनी मूल्यमापनाच्या आधुनिक पद्धती, डॉ. संदीप बोडके यांनी अध्यापनशास्त्र कौशल्य व डॉ. चेतन चव्हाण यांनी विषयज्ञान प्रभुत्व या विषयावर मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेच्या कार्याध्यक्ष डॉ. सौ. सुहासिनी संत व संस्थेचे विभागीय सचिव डॉ. महेश औटी यांनी सर्व प्राध्यापकांचे अभिनंदन केले. सदर कार्यशाळेचे समन्वय हे डॉ. विनोद गावित व कौशल्य विकसन समन्वयिका डॉ. शिल्पा वाकचौरे यांनी केले. सदर कार्यशाळेमध्ये महाविद्यालयातील 43 विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. तसेच सदर कार्यशाळेसाठी श्री. काशिनाथ चौरे, श्री. मनोहर काळे, श्री. सदाशिव भोसले, श्री. हेमंत येलवे व कु. सिद्धी अंबादासकर यांनी कार्यशाळा संपन्न होण्यासाठी सहकार्य केले.

# आदर्श शिक्षक महापौर पुरस्काराने अजय शिवराम गणविर यांचा सन्मान

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे एकूण ५० शिक्षकांना 'आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार'ने गौरविण्यात आले. त्यामध्ये एच/पश्चिम विभागातील एम पी एस खारदांडा हिंदी शाळा खार पश्चिम चे विद्यार्थी प्रिय, पालक प्रिय, शैक्षणिक, सामाजिक तसेच साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे प्रशिक्षित शिक्षक श्री. अजय शिवराम गणविर यांना बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग द्वारे सर्वोच्च आणि सन्मानाचा आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार 2024-2025 प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार मध्ये 11000/- महापालिका मानचिन्ह पदक (सोन्याचा मुलामा), सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

सदर नयनरम्य कार्यक्रम भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणिसंग्रहालयातील पेंग्विन सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. त्यावेळी अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी, उप आयुक्त (शिक्षण) डॉ. (श्रीमती) प्राची जांभेकर, संचालक (प्राणिसंग्रहालय) डॉ. संजय त्रिपाठी, शिक्षणाधिकारी श्रीमती सुजाता खरे श्रीमती ममता राव , सन्मा. उपशिक्षणाधिकारी व सर्व अधीक्षक शाळा व प्रशासकीय अधिकारी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. आदर्श शिक्षकांनी राबविलेले विविधांगी उपक्रम शिक्षण क्षेत्रासाठी प्रेरणादायी असल्याचे मत यावेळी डॉ. अमित सैनी यांनी व्यक्त केले.




अजय गणविर गेल्या 13 वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले असून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये स्वनिर्मित साहित्य लेखनात आवड निर्माण केली आहे. त्यांच्या समर्पित कार्याची दखल घेऊन त्यांना हा सन्मान देण्यात आला.




पुरस्कार मिळाल्यानंतर आपल्या भावना व्यक्त करताना अजय गणविर म्हणाले, "हा सन्मान केवळ माझा नसून सर्वप्रथम माझ्या विद्यार्थ्यांचा,पालकांचा,शाळेचा, सहकाऱ्यांचा व कुटुंबियांचा आहे. हा पुरस्कार माझ्या जबाबदाऱ्यांत अधिक भर घालणारा आहे."

आदर्श शिक्षक महापौर पुरस्कारच्या प्रवासात सन्मा. प्रशासकीय अधिकारी श्रीमती कांचन गोसावी, विभाग निरीक्षक श्रीम. अनुराधा तारू, श्री.संतोष जाधव, श्रीम.सुनीता भांगरे, शाळेतील मुख्याध्यापिका श्रीम. श्यामा सिंह, श्रीराम चौरसिया, सविता शुक्ला, सूर्यकांत पाटील, संगीता रॉड्रिक्स, छाया मोरे, गोरक्ष आखडकर, विद्या महाजन, वीरश्री कांबळे, अनिता जाधव, अविनय साळगावकर यांचे महत्वाचा योगदान लाभले आहे. हा पुरस्कार मिळाल्याने त्यांच्या सहकारी मित्रपरिवारातून अभिनंदनाचे वर्षाव होत आहे.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शनिवार २० सप्टेंबर २०२५
https://lokaarambh.com



# हुतात्मा देवराव विद्यालयात तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा

## सहकार महर्षी रामकृष्ण बांगर व क्रीडा अधिकारी अविनाश पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन

पाटोदा | प्रतिनिधी शालेय पाटोदा तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेचे हुतात्मा देवराव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेचे उद्घाटन सहकार महर्षी रामकृष्ण बांगर साहेब व क्रीडा अधिकारी अविनाश पाटील यांच्या हस्ते उद्घाटन करून या स्पर्धेची सुरुवात करण्यात आली वयोगट 14 व 17 मुले 19 सप्टेंबर रोजी पहिल्या दिवशी मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या तर 20 सप्टेंबर रोजी दुसऱ्या दिवशी मुलीच्या स्पर्धा होणार आहेत. हुतात्मा देवराव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय भायाळा येथे पाटोदा तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत आयोजन यावर्षी करण्यात आले आहे. उत्कृष्ट मैदान उत्कृष्ट नियोजन असल्यामुळे याही वर्षी तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा हुतात्मा देवराव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजित आयोजित करण्यात आले आहेत. 19 सप्टेंबर रोजी वयोगट 14 व 17 मुले यांच्या स्पर्धा मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या तर 20 सप्टेंबर रोजी मुली 14 व 17 वयोगटातील स्पर्धा होणार आहेत यासाठी सहकार महर्षी रामकृष्ण बांगर साहेब सरपंच तथा सचिव सत्यभामाताई बांगर यांची प्रमुख उपस्थितीमध्ये तसेच क्रीडा तालुका अधिकारी अविनाश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धा संपन्न होत आहेत. पाटोदा तालुक्यातील सर्व शाळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला आहे. या स्पर्धेसाठी विद्यालयाचे प्राचार्य राम वनवे, बी.बी. नागरगोजे, मुळे सर, काळुसे सर, बागडे सर, पाटील सर, जावळे सर, कदम सर, श्रीमती केंगार मॅडम, काळे सर, गर्जे सर, तसेच प्राध्यापक कोल्हे सर, नाईकवाडे मॅडम, पवार सर, जामकर सर, वारभूवन मॅडम,दिनेश बांगर, सोनवणे मामा यांच्यासह सर्व शिक्षकांचे मोठ्या प्रमाणात सहकार्य आणि प्रयत्नतून या स्पर्धा संपन्न होत आहेत...



### विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी बांगर साहेबांची दिवसभर उपस्थिती

शालेय तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा हुतात्मा देवराव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय भायाळा येथे संपन्न होत असून यामध्ये तालुक्यातून येणाऱ्या सर्व शाळेतील विद्यार्थी शिक्षकांना प्रोत्साहन देण्यासाठी सहकार महर्षी रामकृष्ण बांगर साहेब दिवसभर स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहून प्रोत्साहन देत राहिले तसेच त्यांना कोणतीही अडचणी येऊ नये यासाठी योग्य नियोजन सर्व शिक्षक प्राध्यापकांना करण्याच्या सूचनाही दिल्या होत्या..

# डॉक्टर लोक मेलेल्या मड्याचे हि तुप खातात

वाचकांनो काही दिवसापूर्वी मी डॉक्टर लोकांवर लेख लिहिलं होते आणि त्यात क्रमशः असे लिहिले होते. त्याचाच पुढील भाग आज सादर करीत आहे.काही तूरळक डॉक्टर लोक सोडले, ज्या डॉक्टर लोकांची प्रॅक्टिस प्रामाणिक असेल आणि ती सामाजिक भान ठेऊन असेल तर समस्त डॉक्टर लोकांना हे लिखाण चुकीचे वाटणार नाही.काही डॉक्टर समाजाचा फक्त पैशांसाठी उपयोग करतात. सतत पैशाचा ओघ चालूच राहावा असं त्यांना वाटतं. मग सुरू होते याच्यातील स्वतः शीच केलेली स्पर्धा आणि सुरु होते अमानवीय कृत्ये. हो असेच म्हणावे लागेल. कोण येत? किती येतात? त्यांच्याकडून किती पैसे घ्यायचे? त्यासाठी कोण कोणती आजार, रोग सांगू? असे होते या लोकांना. एकदा एका पेशंट ला कापला कि यांना असे वाटते कि आता कोणती प्रॉपर्टी घेता येईल? कुठे इन्व्हेस्टमेंट करू? का वेगवेगळ्या देशात फिरून येऊ? ७-८ वर्ष अभ्यास करून पदवी मिळाली कि यांना वाटतं आपल्याला एक पैसे कमविण्याची मशीन मिळाली. अशी मशीन कि कमी कालावधीत वारेमाप पैसे देणारी. लोकांचे कंबरडे मोडून स्वतःला श्रीमंत करणारी, पाहिजे तिथे प्रॉपर्टी आणि पाहिजे तिथे इन्व्हेस्टमेंट करणारी. या समस्त महाराष्ट्र मधील डॉक्टर लोकांची प्रॉपर्टी आणि ठिकठिकाणी जागा, जमिनी पाहिल्या तर एक अखंड भुप्रदेश तयार होईल. डिग्री मिळताच साठवलेलं हे सारं कमी कालावधीत मिळते कसे? याची खरंच कमाल वाटते. एखाद्या पेशंट ला कसे आणि किती कापायचे? हे डॉक्टर लोकांच्या तळ हातावरील खेळ. मग अश्या वेळी पेशंटच्या घरातील व्यक्तीला सांगितले जाते पेशंट सिरीयस आहे. आयसीयूमध्ये ठेवावे लागेल, ऑपरेशन करावे लागेल, शरीरात रॉड लागेल, अश्या अगणित कारणे देऊन स्वतः चा खिसा पॅक करायचा. एखादा पेशन्ट मेला असला तरी बिलासाठी डॉक्टर लोक आयसीयूमध्ये ॲडमिट करून घेतात. अशावेळी यांच्यातील माणुसकी संपलेली असते का? रोज असे कितीतरी मृत लोकांना जिवंत ठेवतात. विनाकारण ऑपरेशन, विनाकारण मोठमोठाल्या शस्त्रक्रिया, अनेक विविध रोग, आजार सांगून हे लोक मड्या वरील तूप खाण्याचे काम करीत असतात.



खरंतर जुन्या काळात डॉक्टर म्हणजे देवाचं दुसरं रूप मानले जात होते. पण आता हेच रूप रौद्र बनत आहे. समाजाचे आपण काही देणे लागतो. हा विचार हि यांच्या डोक्याला शिवत नाही. मोठं मोठ्या हॉस्पिटल ला तर रोजंच असे कित्येक पेशंटला फसवलं जात आहे. डॉक्टर लोक पेशंटशी चुकीचे आणि गैरसोयीचे उपचार देतात. पेशंटच्या भावनांकडे दुर्लक्ष करतात. चुकीची माहिती देतात किंवा पेशंटला वेळेवर भेटत नाहीत. डॉक्टर च्या चुकांमुळे पेशंट ला मोठा मानसिक, शारीरिक आणि आर्थिक त्रास होतो, ज्यामुळे त्यांचा डॉक्टरांवरील विश्वास कमी होतो आणि आरोग्यसेवेच्या गुणवत्तेवरही परिणाम होतो.

**(क्रमशः)**

**लेखन - रुपाली देशपांडे**

**संपर्क - ८८८८९५५५३९**



आज जुना बाजार बीड येथे कामगार सेना कार्यालय व हिंद मल्टी सर्विस सेंटरचे कार्यालयाचे चे उद्घाटन थाटात संपन्न झाले त्याप्रसंगी प्रसंगी हिंद मल्टी सर्विस चे मालक नवीद खान उर्फ(बाबा खान) यांनी समाजसेवक मुसाखान पठाण यांच्या शाल हार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला त्याप्रसंगी सोबत जैद कादरी दिसत आहेत...



विजय पालसिंगनकर कुलकर्णी यांच्या वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा शाल श्रीफळ देऊन सत्कार करताना भारतीय जनता पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ अण्णा शिराळे पाटील मिराताई गांधले जयश्री मुंडे संध्या राजपूत बालाजी पवार सौ कुलकर्णी ताई परजने पाटील इत्यादी मान्यवर उपस्थित होते

# कानपुर पोलिसांवर तात्काळ बडतर्फ करुन देशद्रोहीचे गुन्हे दाखल करा

माजलगांव फेरोज पठाण , कानपुर येथील ईद ए मिलाद च्या मिरवणुकीत आय लव्ह मुहम्मद लिहिलेले फलक लावले म्हणून उत्तर प्रदेश पोलिसांनी अनेक मुस्लिम तरुणांवर गुन्हे दाखल केल्याची बातमी बाहेर आल्यावर देशभभरात कानपुर पोलीसांनी केलेल्या या मनमानी कारभार करणाऱ्या बडतर्फ करा हा प्रकार हुकूमशाही कडे जाणारा आहे.भारतीय संविधानाने प्रत्येक भारतीयाला आपापल्या धर्मानुसार वागण्याचा हक्क दिलेला आहे. जर सरकार संविधान विरोधी वागू लागले तर कठीण होईल सोशल मिडिया वर I Love Muhammad Trend एक नंबर वर झाल्यावर कानपुर पोलीसांनी यु टर्न घेत कारवाई ला दुसरे एंगल देऊन बचावाची भुमिका स्विकारली.मुस्लिमांनी यापुढे आपसातले मतभेद संपवून भारतीय संविधानाने दिलेल्या अधिकारा नुसार मुख्य प्रवाहात यावे..राहिला प्रश्न पैगंबर मुहम्मद साहेबांवर प्रेमाचा, तर ते जीव गेला तरी कायम राहील.. कानपुर पोलिसांना तात्काळ बडतर्फ करुन त्याच्या वर देशद्रोही चे गुन्हे दाखल करण्यात यावे




मुस्लिम समाजात भावना दुखविल्याबद्दल त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावे .

मुस्लिम समाज

# अतिवृष्टीने शेतात पाणी साचले , नांदूर हवेली व पेंडगाव येथे तहसीलदार शेळके यांची पाहणी

जिल्ह्यातील सततच्या पावसामुळे शेतकरी संकटात सापडला आहेत . कापूस आणि सोयाबीन पिकांवर पावसाचे पाणी साचल्याने उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे . या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी नांदूर हवेली आणि पेंडगाव येथे प्रत्यक्ष पाहणी केली .

नांदूर हवेली शिवार : पाण्यात उभा कापूस - तहसीलदार शेळके यांनी नांदूर हवेली येथील गट क्रमांक १ ते ७ तसेच शेतकरी प्रेमनाथ धांडे यांच्या शेताची पाहणी केली . येथे कापसाच्या पिकाचा पेरा असून मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याचे दिसले . शेतकऱ्यांमध्ये यामुळे उत्पादनावर परिणाम होईल की काय , अशी चिंता व्यक्त होत आहे . कपाशीवर गोगलगाय अथवा शंख अळी असा एक नवीन रोग किंवा प्रकार पाहायला मिळाला . जिथे ओल जास्त असेल अशा भागात कापसावर गोगलगायी (शंख ) दिसतात , असे उपस्थितांनी नमूद केले . त्या गोळा करून काढून फेकणे हाच एकमेव पर्याय आम्ही वापरतो असे गावकऱ्यांनी नमूद केले . या पाहणीवेळी शेतकरी शाकेर शेख , सलीम शेख , मजीद शेख , रफिक शेख , मुबिन शेख , असलम शेख , शाहरुख शेख , शाम लाकडे , अकील शेख , बंडू बुधनर , शेषनारायण बुधनर , गणेश बुधनर , शेख अब्दुल रहमान , नवाब शेख आदी उपस्थित होते .



पेंडगाव शिवार : पाण्याखाली सोयाबीन - यानंतर शेळके यांनी पेंडगाव (तालुका बीड) येथील काळकुटे यांच्या गट क्रमांक ८७ मधील सोयाबीन पिकाची पाहणी केली . येथेही शेतात पाणी साचून पिकावर परिणाम झाल्याचे आढळले . शेतकऱ्यांनी शासनाकडे तात्काळ मदतीची अपेक्षा व्यक्त केली आहे .

शासनाचे आश्वासन : दिलासा मिळणार - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जनतेला आवाहन केले की , “ नैसर्गिक आपत्तीसमोर प्रशासन ठाम आहे . कोणत्याही शेतकऱ्याला आधाराशिवाय राहावे लागणार नाही .” अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी नागरिकांना संयम राखण्याचे व प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन केले . निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे वेळोवेळी आपत्तीस्थितीचा आढावा घेऊन आवश्यक सूचना देत आहेत . बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनीही आवाहन केले की , “शेतकऱ्यांनी पंचनाम्यासाठी समितीशी सहकार्य करावे . प्रत्येक गावात प्रशासन तुमच्या पाठीशी आहे .”

तहसीलदार शेळके यांनी शेतकऱ्यांना सेवा पंधरवडा , ई पिक पाहणी व अतिवृष्टीसंदर्भात शासनाकडून सुरू असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली . त्यांनी सांगितले की , “प्रशासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे . पंचनामे तात्काळ होतील असे आश्वासन त्यांनी दिले .” त्यांच्यासोबत मंडळ अधिकारी अंगद काशीद , ग्राम महसूल अधिकारी गणेश गायकवाड , विकास ससाणे , पवार आप्पासाहेब हे उपस्थित होते .

शेतकऱ्यांच्या मनातील वेदना : शेतात उभे असलेले पीक पाण्यात बुडाल्याने शेतकऱ्यांच्या डोळ्यांत चिंता आहे . मेहनतीने उभी केलेली पिके एका झटक्यात नष्ट होण्याची भीती त्यांना सतावत आहे . “ पावसाच्या थेंबांनी हिरवळ तर दिली , पण अतिरेकी पाण्याने स्वप्नंही गिळी ; शेतकऱ्यांच्या कष्टांचा न्याय व्हावा , धरतीमातेच्या घामाला साथ मिळावी !” अशी सध्या परिस्थिती आहे . या आपत्तीतून सावरण्याचे शेतकऱ्यांना बळ मिळो आणि निसर्गाची सुद्धा यास साथ मिळो अशी प्रार्थना !

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com